## रे.दि.मु. क्र. १०४/२०२० मधील निशाणी ५ वरील आदेश

(अजित सुर्यकांत वाघ विरुध्द सुर्यकांत दाजी वाघ व इतर)

वादीने प्रतिवादी क्र. १ विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम पारीत होवून मिळण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ प्रमाणे प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**वादीचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः**

२. अर्ज कलम १ मध्ये नमूद मिळकती या प्रस्तुत अर्जाचा वाद विषय असून यापुढे सोईकरीता त्यास ''दावा मिळकती'' असे संबोधण्यात आले आहे.

३. दावा मिळकती ह्या वादीच्या वडीलार्जीत मिळकती असुन प्रतिवादी क्र. १ हे वादीचे वडील व प्रतिवादी क्र. २ ही आई आहे. प्रतिवादी क्र. ३ हे प्रतिवादी क्र. १ चे कोणीही लागत नाही. प्रतिवादी क्र. ३ चे प्रतिवादी क्र. १ शी आलेल्या संबधातुन प्रतिवादी क्र. ४ ते ६ ही अपत्ये झाली आहेत. प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांचा दावा मिळकतीत कोणताही हक्क व अधिकार नाही. प्रतिवादी क्र. १ यास दारुचे व्यसन आहे. त्यामुळे तो दारुच्या आहारी जावुन दावा मिळकती त्यास कोणतीही कायदेशीर गरज नसताना विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादी क्र. १ ला दि. ०५/०६/२०२० रोजी दावा मिळकतीचे वाटप करुन मागितले असता प्रतिवादी क्र. १ ने त्यास नकार दिला. करीता, वादीने वाटपाचा दावा दाखल करुन प्रस्तुतचा ताकीद अर्ज दाखल केला आहे. वादीच्या मते प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकत कायदेशीर गरजे शिवाय विक्री केल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे व त्यास दावा मिळकतीतील त्याचे हिश्श्यास कायमचे मुकावे लागणार आहे.

४. वादीचे मते त्यास प्रथमदर्शनी केस आहे, न्यायाचा तराजु देखील त्याचेच बाजुने आहे. अशा परिस्थीतीत वादीच्या मागणी प्रमाणे ताकीद न दिल्यास वादीचे अपरिमीत असे नुकसान होणार आहे. करीता, प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकतीचे वाटप होई पावेतो दावा मिळकतीत त्रयस्त इसमांचा कोणत्याही प्रकारे हितसंबध निर्माण करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद पारीत होवुन मिळण्याची विनंती केली आहे.

५. प्रतिवादी क्र. १ ने निशाणी ३२ वर म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. प्रतिवादीने वादीच्या अर्जातील कथने नाकारली आहेत. प्रतिवादी क्र. १ चे म्हणण्याचा सारांश असा की, प्रतिवादी क्र. १ चे प्रतिवादी क्र. ३ शी दि. १३/०५/१९७७ रोजी शेडगेवाडी ता. पाटण येथे विवाह झाला असुन प्रतिवादी क्र. ३ हि त्याची कायदेशीर पत्नी आहे. सदर संबधातुन प्रतिवादी क्र. १ यास प्रतिवादी क्र. ४ ते ६ ही अपत्ये झाली आहेत. वादीने प्रतिवादी क्र. २ हीचे प्रतिवादी क्र. १ शी विवाह कधी झाला, कसा झाला याबाबत तपशील दिलेला नाही. वादीच्या अर्जातील कथने संदिग्ध व मोघम आहेत. वादीने न्यायालया पासुन प्रतिवादी क्र. १ व ३ यांचे विवाह संबधा बाबत खरी वस्तुस्थीती लपवुन ठेवली आहे. प्रतिवादी क्र. १ यास कोणतेही दारुचे व्यसन नाही व तो दावा मिळकत विकण्च्या प्रयत्नात नव्हता व नाही. वादी व प्रतिवादी क्र. २ हे त्याचे कुटुंबाचे कधीही घटक नव्हते. त्यामुळे त्यांना दावा मिळकतीत कोणताही अधिकार येत नाही. वादी हा जळगांव येथे त्याची पत्नी, मुले व प्रतिवादी क्र. २ याच्यासह वास्तव्यास आहे. वादीने प्रतिवादी क्र. २ कडे केव्हाही वाटपाची मागणी केली नाही. प्रतिवादी क्र. १ यास शेती सोडून कोणतेही दुसरे उत्पन्नाचे साधन नाही. शेती करीता त्यास दरवर्षी वित्तीय संस्थे कडुन कर्ज घ्यावे लागते.

वादी हा प्रतिवादी क्र. १ चा कायदेशीर मुलगा नाही. अगर प्रतिवादी क्र. २ ही प्रतिवादी क्र. १ ची पत्नी नाही. त्यामुळे वादीस जन्मतः दावा मिळकतीत हक्क येत नाही. परिणामी वादीस वाटप मागण्याचा व तुर्तातुर्त ताकीद मागण्याचा अधिकार नाही.

६. प्रतिवादी क्र. १ च्या मते वादीस सकृत दर्शनी केस नाही. त्यास दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्क व हितसंबध नाही. परिणामी, वादीस प्रस्तुतचा दावा व तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज दाखल करण्याचा हक्क नाही. अशा परिस्थीतीत वादीच्या मागणी प्रमाणे प्रतिवादी क्र. १ विरुध्द ताकीद दिल्यास प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. करीता, प्रतिवादी क्र. १ ने वादीचा ताकीद अर्ज नामंजूर होण्याची विनंती केली आहे.

७. वरीलप्रमाणे वादीचा अर्ज, प्रतिवादी क्र. १ चे म्हणणे व दाखल कागदपत्रे पाहता तसेच वादी व प्रतिवादी यांचे सुविद्य विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकता खालील मुद्दे माझे विचाराधीन आहेत. त्यावरील निष्कर्ष व त्यांची कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| **अ.न.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी सकृतदर्शनी केस त्याचे बाजूने असल्याचे शाबीत करतात काय? | नाही. |
| २. | न्यायाचा तोल त्याच्या बाजूने असल्याचे वादी शाबीत करतात काय? | नाही. |
| ३. | तुर्तातुर्त ताकिद न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय? | नाही. |
| ४. | काय आदेश? | अर्ज नामंजूर. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करीता-**

८. वादी तर्फे विधिज्ञ श्री. एस. जी. डांगे व प्रतिवादी क्र. १ तर्फे विधिज्ञ श्री. डी. एम. बर्गे यांचा युक्तीवाद ऐकला. वादी व प्रतिवादी विधिज्ञांनी त्यांचे कथनास अनुसरुन युक्तीवाद सादर केला.

९. वादीने मुळ दावा हा दावा मिळकती ह्या त्याचे वडीलार्जीत मिळकती असुन त्यांचे वाटप होवुन मिळण्याकरीता दाखल केला आहे. हिंदू कायद्यातील तसेच हिंदू विवाह कायद्याचे तरतुदी नुसार केवळ कायदेशीर विवाह बंधनातुन जन्माला आलेल्या अपत्यांना जन्मतः वडीलार्जीत मिळकतीमध्ये हक्क निर्माण होतो. जी अपत्ये कायदेशीर विवाह बंधनातुन जन्माला येत नाहीत, त्यांना वडीलार्जीत मिळकतीमध्ये हक्क प्राप्त होत नाही. त्या अनुशंगाने वादी व प्रतिवादी यांची परस्पर विरोधी कथने पाहीली असता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणात प्रवितादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ हि त्याची कायदेशीर पत्नी व वादी हा मुलगा असल्याचे नाकारले आहे. तर वादीने प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांचा प्रतिवादी क्र. १ शी कोणतेही नातेसंबध नसल्याचे कथन केले आहे.

१०. प्रस्तुतचा तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज निकाली करते समयी वादीने स्वतंत्ररित्या त्याची प्रथमदर्शनी केस म्हणजे प्रतिवादी क्र. २ (वादीची आई) ही प्रतिवादी क्र. १ ची कायदेशीर पत्नी असुन त्या कायदेशीर विवाह बंधनातुन वादीचा जन्म झाला आहे हे शाबीत करणे गरजेचे आहे. त्या अनुशंगे वादी व प्रतिवादी क्र. १ यांनी आणलेला अभिलेखावरील पुरावा पाहीला असता असे दिसुन येते की, वादीने दाव्यात व ताकदी अर्जात प्रतिवादी क्र. १

हे वादीचे वडील व प्रतिवादी क्र. २ ही वादीची आई आहे इतकाच मजकूर दिला आहे. ज्यावेळी वादी हा प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांचा प्रतिवादी क्र. १ शी असणाऱ्या कायदेशीर संबधा बाबत त्याचे दाव्यात वाद उपस्थीत करतो व प्रतिवादी क्र. २ हि प्रतिवादी क्र.१ ची कायदेशीर पत्नी असुन तो प्रतिवादी क्र. १ चा कायदेशीर मुलगा असल्याचे कथन करतो त्यावेळी वादीने प्रथमदर्शनी पुराव्या सह प्रतिवादी क्र. २ हि प्रतिवादी क्र. १ पत्नी असल्याचे शाबीत करणे गरजेचे आहे. परंतु, वादीने प्रतिवादी क्र. २ म्हणजे वादीची आई हिचा प्रतिवादी क्र. १ याच्याशी कोठे, कोणत्या तारखेस कसा विवाह झाला, तो विवाह कसा कायदेशीर आहे याबाबत तीळमात्र उल्लेख त्याच्या दाव्यात व ताकीद अर्जात केलेला नाही. तसेच त्याबाबत कोणताही पुरावा आणलेला नाही. उलटपक्षी प्रतिवादीने त्याचे म्हणण्यात दि. १३/०५/१९७७ रोजी त्याचे प्रतिवादी क्र. ३ शी शेडगेवाडी ता. पाटण, जिल्हा सातारा येथे विवाह झाल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी क्र. १ याने त्याचे कथनाच्या पुष्ठ्यर्थ अभिलेखावर निशाणी ३६ च्या यादी लगत अनुक्रमांक १ वर प्रतिवादी क्र. ३ शी झालेल्या विवाहाची विवाह पत्रीका दाखल केली आहे. सदर विवाह पत्रीकेचे अवलोकन केल असता, त्यामध्ये प्रतिवादी कथन करीत असल्या प्रमाणे दि. १३/०५/१९७७ रोजी प्रतिवादी क्र. १ व ३ यांचे लग्न होते हे दिसुन येते.

११. वादीने निशाणी ४३ चे यादीसह स्वतःचा रहिवासी दाखला, जन्माचा दाखला, पॅनकार्ड, आधारकार्ड व प्रतिवादी क्र. ४ हिची लग्नाची पत्रीका व प्रतिवादी क्र. १ च्या रेशनकार्ड यांच्या प्रती दाखल केल्या आहेत. उलटपक्षी प्रतिवादी क्र. १ ने देखील निशाणी ३६ च्या यादी लगत प्रतिवादी क्र. ४, ५ व ६ यांचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र

दाखल केले आहे. वादीने दाखल केलेले ओळखपत्र, पॅनकार्ड व रहिवासी दाखला यावर त्याचे वडिलांचे नाव प्रतिवादी क्र. १ चे दिसुन येते. परंतु सदर दस्त ऐवजा वरुन प्रतिवादी क्र. २ हि प्रतिवादी क्र. १ ची कायदेशीर पत्नी असुन वादी हा कायदेशीर विवाह बंधनातुन जन्माला आला हे शाबीत होत नाही. वादीने निशाणी ४३ चे यादीलगत दाखल केलेली प्रतिवादी क्र. ४ हिची लग्नपत्रीका व प्रतिवादी क्र. १ चे रेशनकार्डचे अवलोकन केले असता, त्यामध्ये प्रतिवादी क्र. २ व ३ यांची नावे प्रतिवादी क्र. १ याची पत्नी म्हणून नमूद आहेत. रेशनकार्ड व प्रतिवादी क्र. ४ चे लग्नपत्रीके वरुन प्रतिवादी क्र. २ अथवा ३ यापैकी नेमकी कोण प्रतिवादी क्र. १ ची कायदेशीर पत्नी आहे हे शाबीत होत नाही.

१२. एकंदरीत, वादी व प्रतिवादी क्र. १ यांनी आणलेला प्रथमदर्शनी पुरावा व त्याबाबत वरील विवेचनावरुन असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. २ हि प्रतिवादी क्र. १ ची कायदेशीर पत्नी असुन वादी हा कायदेशीर विवाह संबधातुन जन्माला आलेले अपत्य आहे हे शाबीत करण्यास वादी अपयशी ठरला आहे. ज्या अर्थी वादी हा तो प्रतिवादी क्र. १ व २ यांचे कायदेशीर विवाह संबधातुन जन्माला आल्याचे शाबीत करण्यास अपयशी ठरला आहे. त्याअर्थी वादीस प्रतिवादी क्र. १ याचे वडीलार्जीत मिळकतीमध्ये जन्मतः हक्क प्राप्त होत नाहीत. परीणामी वादी हा प्रस्तुत अर्जातील मागणी प्रमाणे प्रतिवादी क्र. १ विरुध्द तुर्तातुर्त ताकीद पारीत होवुन मिळण्यास पात्र नसल्याचे प्रथमदर्शनी शाबीत होते. करीता, वादी हा त्याची प्रथमदर्शनी केस शाबीत करण्यास अपयशी ठरला आहे या निष्कर्शाप्रत येवुन मुद्दा क्र. १ चे मी उत्तर नकारार्थी नोंदविले आहे.

**<u>मुद्दा क्र. २ व ३ करीता–</u>**

१३. मुद्दा क्र. १ चे विवेचनावरुन वादी हा त्याची प्रथमदर्शनी केस शाबीत करण्यास अपयशी ठरला आहे. अशा परिस्थीतीत दाव्याचा समतोल देखील वादीच्या बाजुने दिसुन येत नाही. ज्या अर्थी वादी हा प्रथमदर्शनी केस शाबीत करुन करु शकला नाही, त्याअर्थी प्रस्तुत अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे नेमके कोणतेही नुकसान होणार नाही. करीता, मुद्दा क्र. २ व ३ चे उत्तर मी नकारार्थी नोंदविले आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करीताः–</u>**

१४. तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज पारीत होवुन मिळण्याकरीता लागणारे आवश्यक घटक म्हणजे प्रथमदर्शनी केस, न्यायाची बाजु व अर्ज नामंजूर झाल्यास होणारे अपरिमीत नुकसान या तिनही बाबी वादी शाबीत करण्यास अपयशी ठरला आहे. परिणामी, वादीचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी मुद्दा क्र. ४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतीम निकालावर अवलंबून राहील.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Akshay Sambhaji Jagatap
Date: 2020.07.30 11:23:18 +0530

कोरेगाव

दि. ३०/०७/२०२० सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.